

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५६ ▪ गुरुवार २६ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

एलसीबीचे एकाच दिवसात ३७ ठिकाणी छापे

अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम, १ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त







दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार २५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात एकाच दिवसात ३७ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत ३७ गुन्हे दाखल करून एकूण १ लाख ८८ हजार ३८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांची सहा स्वतंत्र पथके तयार केली होती. या पथकांनी गोपनीय माहितीच्या आधारे जिल्ह्यातील एमआयडीसी, शेवगाव, नगर तालुका, कोपरगाव तालुका, कोपरगाव शहर, राहाता आणि शिर्डी या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी छापेमारी केली.

या कारवाईत अवैध दारू विक्रीचे सर्वाधिक २४ गुन्हे दाखल करून १ लाख ७१ हजार ६५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये नगर तालुका हद्दीत सर्वाधिक ९ गुन्ह्यांत १ लाख २६ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच शेवगाव (३ गुन्हे, १३,२६० रुपयांचा मुद्देमाल), कोपरगाव तालुका (४ गुन्हे, ११,५५० मुद्देमाल), कोपरगाव शहर (४ गुन्हे, ९,६०० मुद्देमाल), राहाता (१ गुन्हा, ५,३७५ मुद्देमाल), एमआयडीसी (२ गुन्हे, २,६८० मुद्देमाल) आणि शिर्डी (१ गुन्हा, २,६८० रुपयांचा मुद्देमाल) येथेही कारवाई करण्यात आली.

त्याचबरोबर जुगार अड्ड्यांवर टाकलेल्या छाप्यांत १३ गुन्हे दाखल करून १६ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात कोपरगाव तालुका (३ गुन्हे, ७,५०० रुपयांचा मुद्देमाल), एमआयडीसी (३ गुन्हे, २,२३० मुद्देमाल), नगर तालुका (२ गुन्हे, १,८५० मुद्देमाल), शेवगाव (३ गुन्हे, १,७५० मुद्देमाल), राहाता (१ गुन्हा, १,७५० मुद्देमाल) आणि शिर्डी (१ गुन्हा, १,६५० रुपयांचा मुद्देमाल) येथील कारवायांचा समावेश आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, अनंत सालगुडे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अंमलदारांनी केली.

संविधान दिन सामाजिक बांधिलकी आणि अधिकार-जाणिवेचे प्रतीक- आमदार संग्राम जगताप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन; संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने संविधान गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मार्केटयार्डसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठन करण्यात आले. यावेळी संविधानाच्या सामूहिक पठनाने परिसर दुमदुमून गेला. आमदार संग्राम जगताप यांना संविधानाच्या उद्देशिकेची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या भारतीय संविधानामुळे जगाला प्रगल्भ लोकशाहीची प्रचिती आली. राजेशाहीचा अंत करून देशाची सूत्रे सर्वसामान्य मतदारांच्या हातात देण्याचे ऐतिहासिक कार्य संविधानाने केले. संविधान हे कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण भारतीयांचे आहे. संविधानामुळे देशात समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा भक्कम पाया निर्माण झाला आहे. या संविधानिक मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आणि निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी सुरेश बनसोडे म्हणाले की, संविधान दिन हा सामाजिक बांधिलकी आणि आपल्या अधिकारांच्या जाणीवेचे प्रतीक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे आपल्या आयुष्याचे दिशादर्शक आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी संविधानाने मजबूत चौकट निर्माण केली आहे. त्यामुळे प्रत्येकाने संविधानातील मूल्यांचे जतन, पालन ▪ पान ४ वर

गंगासागर यात्रेकरूंच्या संकटात नीलेश लंके यांची धाव

दिल्लीतील यंत्रणांशी संपर्क साधून भाविकांना दिलासा





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– गंगासागर येथे देवदर्शनासाठी गेलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शेकडो भाविकांच्या प्रवासी जहाजाचा काल समुद्रात अपघाताचा गंभीर प्रसंग उद्भवला. कचुबेरिया जेटी क्रमांक एकवरून काकद्वीपकडे निघालेले जहाज पाण्याच्या मध्यभागी अचानक असंतुलित होऊन एका बाजूला झुकले आणि जवळपास तासभर अडकून पडले. या संकटाची माहिती मिळताच खासदार नीलेश लंके यांनी दिल्लीतील संबंधित यंत्रणा आणि महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधत भाविकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पाठपुरावा केला. तब्बल अर्धा तास भाविकांच्या संपर्कात राहून सर्व प्रवासी सुखरूप काकद्वीप किनाऱ्यावर पोहोचेपर्यंत त्यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले. सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

या घटनेतील गंभीर बाब म्हणजे जहाजाची क्षमता केवळ १५० ते २०० प्रवाशांची असताना त्यामध्ये तब्बल ३०० ते ३५० प्रवाशांना बसविण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच प्रवाशांच्या सुरक्षेसाठी जहाजात अवघी २५ ते ३० लाईफ जॅकेट्स उपलब्ध असल्याची बाब समोर आली आहे. प्रवाशांच्या क्षमतेपेक्षा अधिक लोकांना जहाजात बसविणे आणि सुरक्षेच्या आवश्यक साधनांची अपुरी व्यवस्था ठेवणे हा सामान्य भाविकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी म्हटले आहे.

संकटाच्या प्रसंगी भाविकांना आवश्यक माहिती न देणे, तसेच किनाऱ्यावर पोहोचल्यानंतर सुरक्षेच्या व्यवस्थेबाबत जाब विचारणाऱ्या भाविकांशी संबंधित अधिकाऱ्यांनी अरेरावी केल्याचा प्रकारही गंभीर आहे. देवदर्शनासाठी जाणाऱ्या सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. अशा बेजबाबदार व्यवस्थेला कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही, अशी ठाम भूमिका खासदार लंके यांनी व्यक्त केली.

केंद्रीय बंदरे, ▪ पान ४ वर

भगवानगड पिण्याचे व शेती सिंचनाच्या पाण्यासाठी शेतकरी महिला ऊसतोड मजुरांचा उद्रेक; कितने यांच्या उपोषणाला यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





(छाया : सतिष जगताप)

खरवंडी कासार– पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भगवानगड परिसर आणि त्यासह ४७ गावांमध्ये भगवानगड ४७ गाव पाणीपुरवठा योजना तसेच ४७ गावासाठी शेती सिंचनाच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी या मागणीसाठी २१ नोव्हेंबर पासून ओबीसी कार्यकर्ते प्रल्हाद कीर्तने यांनी खरवंडी कासार येथील गोपीनाथ मुंडे चौकात आमरण उपोषण सुरू केले होते उपोषणाच्या सहाव्या दिवशी कल्याण विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग ६१ वर भगवानगड परिसरातील बारा वाड्यातील शेतकरी महिला ऊसतोड मजूर कष्टकरी वंचित पीडित श्रमिक लोकांनी एकत्र येऊन महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत तब्बल तीन तास महामार्ग रोखत प्रशासनाला धारेवर धरले.

यावेळी ज्येष्ठ नेते ॲड.प्रताप ढाकणे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके आंदोलक लहू दराडे प्रल्हाद कीर्तने पांडुरंग खेडकर महादेव दराडे विठ्ठल खेडकर अशोक गोल्हार यांनी भगवानगड ४७ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू करणे व ताजनापूर लिफ्ट क्रमांक तीन प्रकल्पातून भगवानगड आणि परिसरात शेती सिंचनासाठी पाणी योजनेच्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय पवार उपअभियंता रंजक विश्वे ताजनापुर प्रकल्प लिफ्ट क्रमांक ३ उपअभियंता कुलकर्णी तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी आंदोलकांशी चर्चा करून भगवानगड ४७ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम ४ डिसेंबर पर्यंत प्रत्यक्षात सुरू करण्याचे लेखी पत्र दिले व भगवानगड परिसराच्या गावांना शेती सिंचनासाठी पाणी देण्यासाठी ताजनापूर प्रकल्प लिफ्ट क्रमांक ३ सर्वे क्षण आणि प्रकल्प अहवाल सादर करणे प्रस्ताव मंजूर होऊन त्यासाठी निधी ६३ लक्ष २६ हजार ९५५ रुपये मंजूर झाल्याचे लेखी पत्र देऊन आंदोलक प्रल्हाद कीर्तने यांनी सुरू केलेले आमरण उपोषण तूर्तास प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले यावेळी संजय बडे सुभाष केकान महारुद्र कीर्तने पांडुरंग खेडकर महादेव दराडे संजय कीर्तने राजेंद्र जगताप वामन कीर्तने नितीन कीर्तने वसंत खेडकर अशोक खरमाटे किरण खेडकर सुनील खेडकर प्रदिप पाटील आबासाहेब खेडकर डॉ.ज्ञानेश्वर दराडे आजिनाथ कीर्तने शेषराव ढाकणे बाळासाहेब गोल्हार माणिक खेडकर आबासाहेब खेडकर तसेच हजारो आंदोलक उपस्थित होते आंदोलनस्थळी भगवानगड आणि परिसराच्या वाड्यावर पडलेल्या दुष्काळाच्या पिण्याच्या पाण्याचे टँकर चारा छावण्या इत्यादी समस्याबाबत ॲड.प्रताप ढाकणे यांनी तहसील प्रशासनाला धारेवर धरले यावेळी पंचायत समिती गटविकास ▪ पान ४ वर

शहीद जवानांचे बलिदान आणि संविधानातील मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी - नलिनी गायकवाड

२६/११ च्या हल्ल्यातील शूर जवानांना हुतात्मा स्मारक येथे अभिवादन; संविधान दिनानिमित्त दक्षता व शांतता समितीच्या सदस्यांचा उपक्रम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– देशाच्या सुरक्षेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर जवानांचे बलिदान देशवासीय कधीही विसरू शकणार नाहीत. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण पत्करलेल्या जवानांच्या शौर्याचे स्मरण करत त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. तसेच भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून संविधानातील लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा जागर करण्यात आला.

दक्षता व शांतता समितीच्या सदस्यांच्या वतीने अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक येथे हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शहीद जवानांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या सर्वोच्च त्यागाप्रती आदर व्यक्त करण्यात आला.

यावेळी सोशल ऍक्टिव्हिटीस. नलिनी गायकवाड म्हणाल्या की, २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या शूर जवानांचे शौर्य आणि त्याग प्रत्येक भारतीयाने कायम स्मरणात ठेवला पाहिजे. देशाच्या सुरक्षेसाठी ▪ पान ४ वर

केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे यांच्या पाठपुराव्याला यश

दुष्काळग्रस्त भागात चारा बँक सुरू करण्यास शासनाची मंजुरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– जिल्ह्यात वाढत्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा व पाणी उपलब्धतेचा प्रश्न गंभीर होत असताना, केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करून चारा नियोजन करण्यास शासनाने मंजुरी दिल्याने पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप मंडल स्तरावर दुष्काळग्रस्त भागांचा आढावा घेण्यात येत आहे. सध्या जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढत असून पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. अशा परिस्थितीत पशुधन टिकवणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. पशुधनासाठी पुरेसा चारा आणि पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पालकमंत्र्यांनी मंडल अध्यक्षांना संबंधित भागांमध्ये लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या अनुषंगाने केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे यांनी जिल्ह्यातील पशुधनासाठी चारा व पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत, पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय व पणन मंत्री जयकुमार रावल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करण्यात याव्यात, जेणेकरून चाऱ्याचे योग्य नियोजन करून पशुधनाला आवश्यक चारा उपलब्ध होईल, अशी मागणी त्यांनी या निवेदनातून केली होती.

भरत ठुबे यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत मंत्री जयकुमार रावल यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. शेतकरी ▪ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख यांना शिक्षण रत्न पुरस्कार

अहिल्यानगर - शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने



कार्य करत विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान देणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना परतगंगा व जिद्द फाऊंडेशनच्या वतीने 'शिक्षण रत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, शाळांच्या भौतिक सुविधा विकसित करण्यासाठी लोकसहभागातून प्रयत्न करणे आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविणे, अशा विविधांगी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून आपल्या सेवाकाळात अनेक विद्यार्थ्यांना घडवून त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे कार्य केले आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, गुणवत्ता, सामाजिक जाणीव आणि संस्कार रुजविण्यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे. शेख यांनी ज्या-ज्या ठिकाणी शिक्षक म्हणून सेवा बजावली, त्या-त्या ठिकाणी शाळांच्या विकासासाठी पुढाकार घेतला. ग्रामस्थांना सोबत घेऊन लोकसहभागातून शाळांच्या इमारती उभारण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. किन्ही (पारनेर), दरेवाडी (नगर), हिवरेझरे (नगर), कनोली (संगमनेर), नाचनगाव (अकोले) आणि नवनागापूर (नगर) येथील शाळांच्या इमारतींची कामे यशस्वीरीत्या मार्गी लावण्यात त्यांनी योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत.शैक्षणिक कार्याबरोबरच चाँद शेख यांनी सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदविला आहे. समाजातील विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांनी केले आहे. विशेष म्हणजे ते उत्कृष्ट पोवाडा गायक असून महाराष्ट्राच्या शौर्यशाली इतिहासाची आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख आपल्या गायनातून करून देतात. पोवाड्याच्या माध्यमातून ऐतिहासिक महापुरुषांचे विचार आणि पराक्रम नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्यही ते करतात. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत परतगंगा व जिद्द फाऊंडेशनने त्यांना 'शिक्षण रत्न पुरस्कार' जाहीर केला आहे. सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

वनिता वसंतलाल कटारिया यांचे निधन

अहिल्यानगर- येथील वसंतलाल हिरालाल कटारिया (दलाल के.वसंतलाल)



यांच्या पत्नी वनिता वसंतलाल कटारिया यांचे गुरूवार दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा मंगेश, दोन मुली मनिषा, मंजुषा, दीर सुरेशलाल, रमेशलाल, पुतणे नितीन, अजय, डॉ.आनंद, विनय, विकास, वैभव कटारिया, नातू गौतम, हिमांशू, यश, तेज, मनन असा मोठा परिवार आहे. त्या मनमिळाऊ स्वभावाच्या व धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सौ.हेमलता गाडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन

अहिल्यानगर - सहकार नगर येथील रहिवासी सौ. हेमलता सुभाष गाडेकर यांचे नुकतेच अल्पशा



आजाराने निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ६७ वर्ष होते.त्या अत्यंत धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचा होत्या.त्यांच्या अकस्मित निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथे नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती,मुलगा,मुलगी,भाऊ, भावजयी,सून,नातवंडे असा परिवार आहे.अँड.सुभाष चंद्रभान गाडेकर यांच्या त्या पत्नी होत.

पारनेरच्या पाणीप्रश्नी खा. नीलेश लंके यांचा पुढाकार

सुपा एमआयडीसीकडून पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी । हंगा तलावातील पाणीसाठा संपल्याने शहरावर टंचाईचे संकट । दररोज आठ लाख लिटर पाणी देण्यासाठी एमआयडीसी अधिकाऱ्यांशी चर्चा । दोन दिवसांत सकारात्मक निर्णयाची ग्वाही

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर शहरातील गंभीर पाणीटंचाई दूर करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी पुढाकार घेतला आहे. पारनेर नगरपंचायतीच्या नगरसेवकांसह खासदार लंके यांनी अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेऊन सुपा एमआयडीसी येथील पंप हाऊसवरून पारनेर शहराला पाणी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा केली. या बैठकीत शहरासाठी दररोज आठ लाख लिटर पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून येत्या दोन दिवसांत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

पारनेर शहरासह हंगा आणि लोणीहवेली गावांना हंगा तलावातून पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र, जुलै महिन्याच्या अखेरीस हंगा तलावातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने नियमित पाणीपुरवठा बंद झाला. त्यानंतर पारनेर शहरातील नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. मात्र, टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा शहरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजेच्या तुलनेत अपुरा पडत असून, नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीत शहराला पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

पारनेर शहराला पाणीटंचाईच्या काळात सुपा एमआयडीसीमधून पाणीपुरवठा करण्यास सन २००६-०७ दरम्यान मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार



यापूर्वी टंचाईच्या कालावधीत एमआयडीसीच्या पंप हाऊसवरून पारनेर नगरपंचायतीच्या पंप हाऊसपर्यंत पाणीपुरवठा करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर नगरपंचायतीला एमआयडीसीच्या पाण्याची आवश्यकता भासली नसल्याने हा पाणीपुरवठा घेण्यात आला नव्हता. यंदा पुन्हा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पारनेर शहराला एमआयडीसीच्या पाण्याची आवश्यकता आहे.

खासदार नीलेश लंके यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करताना पारनेर शहराच्या पाणीप्रश्नाची तीव्रता मांडली. पारनेर हे तालुक्याचे ठिकाण असून, शहरातील नागरिकांसह शहरात ये-जा करणारी लोकसंख्या, शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, शासकीय कार्यालये आणि जनावरे यांची पाण्याची गरज मोठी आहे. सध्याच्या परिस्थितीत शहराला दररोज अंदाजे आठ लाख लिटर पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सुपा एमआयडीसीमधून पाणी उपलब्ध करून दिल्यास शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पारनेर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांनी २५ नोव्हेंबर रोजी एमआयडीसीच्या उपअभियंत्यांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनाद्वारे सुपा एमआयडीसी येथील पंप हाऊसवरून पारनेर नगरपंचायतीच्या पंप हाऊसपर्यंत दररोज आठ लाख लिटर पाणी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.

नगरपंचायतीच्या निवेदनानुसार, शहराला दररोज आठ लाख लिटर पाणी उपलब्ध झाल्यास नागरिकांना किमान सहा दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा करणे शक्य होईल. त्यामुळे सध्या टँकरद्वारे सुरू असलेल्या पाणीपुरवठ्यावरील अवलंबित्व कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल आणि शहरातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होईल.

पारनेर शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी दुरुस्त होईपर्यंत सुपा एमआयडीसी येथील पंप हाऊसवरून टँकरद्वारे पारनेर नगरपंचायतीच्या पंप हाऊसपर्यंत पाणी वाहून आणण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे नगरपंचायतीने निवेदनात नमूद केले आहे. जलवाहिनीची दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत टँकरद्वारे पाणी उपलब्ध झाल्यास शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन सुरळीत करता येणार आहे.

नगरपंचायतीने यापूर्वी १ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे एमआयडीसीकडे पाण्याची मागणी केली होती. त्यावर एमआयडीसी कार्यालयाकडून ८ ऑक्टोबर २०२६ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी खासदार नीलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पाणीटंचाईची सद्यस्थिती, शहराची गरज आणि पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता याबाबत अधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले.

या बैठकीप्रसंगी एमआयडीसीचे उपअभियंता सरदार अनुसे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, अर्जुन भालेकर, बाळासाहेब कावरे, बाळासाहेब नगरे, राजू शेख, भूषण शेलार, विजय भास्कर औटी, ऋषिकेश गंधाडे, अभियंता क्रांती वाघमळे, अभियंता गोरे, लिपिक मारुती ठोंबरे आदी उपस्थित होते. पारनेर शहरातील नागरिकांना पाणीटंचाईतून दिलासा मिळावा, यासाठी एमआयडीसीकडून पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर येत्या दोन दिवसांत सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

संविधान दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेतर्फे ग्रंथपूजन; संविधानाला अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगरच्या वतीने संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाचे ग्रंथपूजन करून भारतीय संविधानाला अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे महत्त्व अधोरेखित करत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधाननिर्मितीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

भारतीय संविधान हे देशातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाची हमी देणारा पवित्र ग्रंथ असून, संविधानातील मूल्यांचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे, असा संदेश यावेळी उपस्थितांनी दिला. संविधानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सचिव गोरख केदारे, बौद्धाचार्य प्रकाश कांबळे, मेजर बाळू कांबळे, परिमलजी निकम, बौद्धाचार्य लक्ष्मण माघाडे, विजय पाटोळे, राजेंद्र थोरात, मोहनजी शिरसाट, राजेंद्र पाडळे, राहुल कांबळे, गौतम पाचरणे, युवराज बनसोड, रतन तुपविरे, अविनाश राक्षे, परमेश्वर गायकवाड, गौतम हंबर्डे, गौतम म्हस्के, अतुल सोनवणे, गौतमी भिंगारदिवे, अमित काळे, कौशल गायकवाड, सुमेध गायकवाड, विजीत कुमार ठोंबे, विद्या शिंद, भरत खाकाळ, दिलीप घुले, कविता भिंगारदिवे, रवींद्र कांबळे, विशाल भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

संत विचार आणि धार्मिक उपक्रम समाजाला एकत्र जोडणारे माध्यम – श्याम नळकांडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– कल्याण रोड येथील भावना ऋषी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. सप्ताहाच्या अंतिम दिवशी ह.भ.प. गायनाचार्य योगेश्वर महाराज जाधव शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने उपस्थित भाविकांना भक्तिरसाचा अनुभव मिळाला. काल्याच्या कीर्तन प्रसंगी दहीहंडी फोडून परंपरेनुसार सप्ताहाची सांगता करण्यात आली.

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे काकडा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध नामवंत कीर्तनकारांनी संतांच्या विचारांचा, भक्तीचा, सदाचाराचा आणि जीवनमूल्यांचा संदेश आपल्या कीर्तनातून दिला. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिनाम, भजन आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला. संपूर्ण सप्ताहात परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



यावेळी नगरसेवक श्याम नळकांडे म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस अनेकदा संस्कार, अध्यात्म आणि आपल्या परंपरांपासून दूर जात आहे. अशा वेळी अखंड हरिनाम सप्ताहासारखे धार्मिक उपक्रम समाजाला एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. संतांच्या विचारांचे श्रवण केल्याने मनाला शांतता मिळते, जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो आणि माणसामध्ये सद्विचारांची रुजवण होते. अशा कार्यक्रमांमुळे नवीन पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख होते आणि धार्मिक परंपरांचे महत्त्व समजते.

ते पुढे म्हणाले, श्री विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठानच्या माध्यमातून परिसरात धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जात आहे. अशा उपक्रमांना नागरिकांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यक्रम केवळ पूजाअर्चे पुरते मर्यादित नसून ते समाजातील बंधुभाव, एकोपा आणि परस्पर सहकार्य वाढविण्याचे माध्यम आहेत. सर्वांनी एकत्र येऊन अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास परिसरात चांगले संस्कार, सकारात्मक वातावरण आणि सामाजिक एकात्मता अधिक दृढ होईल.

आनंद तीर्थ समवशरण येथे सौरभ बोरा मित्र परिवाराचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्म भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २०२६ उत्साहात पार पडला. या चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा परिवाराने मंडप व भोजन व्यवस्थेची जबाबदारी घेतली होती. सौरभ बोरा मित्र परिवाराने चार महिने अतिशय सेवाभावीपणे गौतम प्रसादी (भोजन व्यवस्था) सांभाळली. याबद्दल सौरभ बोरा मित्र परिवार भोजन कमिटीचा समर्पण चातुर्मास कमिटीच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप, पुणे येथील डॉ. कल्याण गंगवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत सौरभ बोरा मित्र परिवाराचे संतोष पिपाडा, किरण राका, सुधीर मुनोत, संजय ताथेड, नितीन चंगेडिया, महेश गुगळे, राहुल गांधी, अमरदीप बोरा, सचिन डुंगरवाल, अजित शिंगवी, अमित चंगेडिया, पंकज मुनोत, निखिल गुगळे, चिराग गुगळे, धीरज कोठारी, मनोज पितळे, सचिन डागा, धनेश गांधी, महेश गुगळे, भूषण बोरा, पवन गुंदेचा, तेजस डागा, नितीन गुगळे, राजू गांधी, सचिन मुनोत, आशिष पिपाडा, संजय सावज, ऋषभ गांधी, सचिन डागा आदींचा सत्कार करण्यात आला.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, सौरभ बोरा मित्र मंडळाचे सर्व सदस्य व त्यांच्या परिवारांनी चार महिने अतिशय सुंदर भोजन व्यवस्था पाहिली. सौरभ बोरा मुंबईत असतात पण येथील सर्व व्यवस्था त्यांच्या मित्र मंडळाने पाहिली. या लोकांनी असे काम केले की गौतम प्रसादीला सौरभ बोरा मित्र मंडळ प्रसादी असेही म्हणता येईल. इतकी उत्तम व्यवस्था त्यांनी केली. सलग चार महिने निरंतर ही जबाबदारी पार पाडताना सर्व सदस्यांच्या कुटुंबांनीही यात सहभाग घेतला. विशेष म्हणजे कोणीही कधीही कसलीही तक्रार केली नाही. खूप प्रेमाने त्यांनी सर्वांना प्रसादी दिली. विशेष म्हणजे यातील अनेकांनी उपवासही केले पण गौतम प्रसादीची सेवा नाही सोडली. समोर पंचपक्वान असूनही उपवास करणे ही साधनाच आहे. या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करून अभिनंदन करा.

सचिन डुंगरवाल म्हणाले, सौरभ बोरा यांनी जेव्हा भोजन व्यवस्थेची जबाबदारी घेतली तेव्हा आम्ही मित्र परिवाराने उत्साहाने प्रतिसाद दिला. जवळपास ३०० लोकांची टीम तयार झाली. हे काम करताना चार महिन्यात आम्हाला खूप सहकार्य मिळाले. आम्हाला विविध संघांनीही सहकार्य केले. ही सर्व व्यवस्था टीम वर्क मुळे शक्य झाली. भविष्यातही अशी सेवा करण्याची संधी मिळाली तर नक्कीच आनंदाने स्विकारू.

पाठपुराव्याची ताकद दाखवली मनोज कोतकरांनी; आदर्शनगरच्या रस्त्याचा वनवास संपला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– केडगाव येथील आदर्शनगर परिसरातील गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. नगरसेवक मनोज कोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या निधीतून या रस्त्याच्या डांबरीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. अनेक वर्षांपासून खराब रस्त्यामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रभाग क्रमांक १७ मध्ये नगरसेवक मनोज कोतकर यांच्या माध्यमातून विविध विकासकामांची घोडदौड सुरू आहे. आदर्शनगर येथील रस्त्याच्या कामाला सुरुवातीला खडीकरणाने प्रारंभ करण्यात आला होता. त्यानंतर आता प्रत्यक्ष डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी बोलताना नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, आदर्शनगर येथील नागरिकांनी गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याच्या समस्येमुळे मोठा त्रास सहन केला आहे. नागरिकांची या रस्त्याची मागणी अत्यंत रास्त होती. ही गरज ओळखून आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. सुरुवातीला खडीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, आता डांबरीकरणाला सुरुवात होत आहे. नागरिकांनी इतकी वर्षे त्रास सहन करूनही दाखवलेल्या संयमाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.



आमदार संग्राम जगताप तसेच सुजयदादा विखे पाटील यांच्या माध्यमातून परिसरात अनेक विकासकामे सुरू आहेत. आदर्शनगरचा पहिला टप्पा आपण पूर्ण केला असून, उर्वरित प्रलंबित कामेही आगामी काळात टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील. नागरिकांनी याबाबत कोणतीही शंका बाळगू नये. आम्ही सर्व नगरसेवक एकत्रितपणे प्रभागातील विकासकामांसाठी प्रयत्नशील राहणार आहोत, अशी ग्वाही मनोज कोतकर यांनी दिली.तसेच सध्या दुष्काळसदृश परिस्थिती असल्याने नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. प्रत्येकाने आपल्या नळाला तोट्या बसवाव्यात, पाणी भरल्यानंतर तोट्या व्यवस्थित बंद कराव्यात. पाऊस सुरू झाला तरी लगेच पाणीटंचाई दूर होत नाही. त्यामुळे जुलै-ऑगस्टपर्यंत पुरेल अशा पद्धतीने पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, नागरिकांनी पाणी बचतीसाठी सहकार्य करावे, असेही ते म्हणाले.

नगरसेवक मयूर बांगरे म्हणाले की, प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे पहिले कर्तव्य आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आदर्शनगर दूधसागर येथील रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणे ही नागरिकांसाठी आनंदाची बाब आहे. मनोज कोतकर यांनी या रस्त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाल्याने आज हे काम प्रत्यक्षात साकारत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

अहिल्यानगरच्या सुपुत्राचा सन्मान: दत्तात्रय वारकड १० व्या राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपुत्र, कवी, लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री. दत्तात्रय वारकड यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे जिल्हा पूर्व विभागाच्या १० व्या राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,पुणे जिल्हा पूर्व विभाग व एमआयटी विद्यापीठ, लोणी काळभोर यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी एमआयटी विद्यापीठातील प्रयाग सभागृह येथे संपन्न होणार आहे.संमेलनाध्यक्ष : मा. श्री. दत्तात्रय वारकड (कवी, लेखक, प्रेरणादायी वक्ते, संत साहित्य अभ्यासक, अहिल्यानगर),उद्घाटक : मा. श्री. प्रा. डॉ. मंगेश कराड (कार्यकारी अध्यक्ष व कुलपती, एमआयटी विद्यापीठ, पुणे) प्रमुख अतिथी व मार्गदर्शक :डॉ.शरद गोरे (राष्ट्रीय अध्यक्ष,अ.भा.म.सा. परिषद) ⁎स्वागताध्यक्ष :⁎ मा.डॉ.महेश चोपडे (कुलसचिव, एमआयटी विद्यापीठ,लोणी काळभोर),मुख्य संयोजक व निमंत्रक :प्रा.डॉ.सुरेश वाळेकर (अध्यक्ष, अ.भा.म.सा. परिषद, पुणे पूर्व विभाग)दत्तात्रय वारकड यांचा परिचयः-संत साहित्याचे अभ्यासक म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेले श्री. वारकड यांनी अल्पावधीतच युवकांमध्ये वैचारिक क्रांती घडवली आहे.कविता,लेखन आणि प्रेरणादायी व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रभर नावलौकिक कमावला आहे. आजपर्यंत त्यांनी १००० हून अधिक प्रेरणादायी व्याख्याने दिली आहेत. तणावमुक्त जीवन,आनंदी जीवनाचा आनंदोत्सव, व्यक्तिमत्व विकास, व्यसनमुक्ती,आजचा युवक व त्याच्यापुढील आव्हाने, मातृ-पितृ व गुरुजनांविषयी आदर,वाचन संस्कृती, मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळणे या ज्वलंत विषयांवर ते शाळा,कॉलेज,तांत्रिक महाविद्यालये,पोलीस प्रशासन,जिल्हा परिषद, शासकीय कार्यालये, एमआयडीसी कंपन्या, आकाशवाणी अशा विविध ठिकाणी प्रबोधन करत आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्राचा लाडका कवी,आळंदी येथील संत ज्ञानेश्वर माऊली राज्यस्तरीय पुरस्कार, कोल्हापूर येथील ३१ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, महात्मा गांधी राज्यस्तरीय पुरस्कार, तसेच २०२७ चा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार(के. कला साधना समिती, लातूर) आणि शिर्डी येथील महाराष्ट्र साई कलाभूषण पुरस्कार २०२७ साठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल शैक्षणिक, सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ही माहिती कवी संमेलनाचे मुख्य संयोजक प्रा.डॉ.सुरेश वाळेकर यांनी दिली.

निमगाव वाघा येथे ९ व्या ग्रामीण साहित्य संमेलनात प्रा. अनुरिता झगडे यांचा हिरकणी पुरस्काराने सन्मान



अहिल्यानगर - महिला अत्याचार विरोधी कार्य आणि प्रेरणादायी समुपदेशनाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरिता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निमगाव वाघा (ता. नगर) येथील स्व.पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था,श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै.नाना डोंगरे व्यायाम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ९ व्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. नवरात्र उत्सवानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यासाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा येथे झालेल्या या सोहळ्यात महिला संरक्षण, महिला अत्याचार विरोधी जनजागृती आणि महिलांमध्ये धाडस निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी व्याख्याने देणाऱ्या प्रा. झगडे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्काराचे वितरण माजी जि.प. सदस्य माधवराव लामखडे, साहित्यिक सी.ए. शंकर अंदानी, पुणे येथील लेखिका प्रा.अश्विनी काळे, धर्मवीर सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक पै. नाना डोंगरे,मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी आदी मान्यवर उपस्थित होते.

'औंदा लग्नाचा इचार नाय' हे पुस्तक समाज परिवर्तनासाठी प्रभावी माध्यम





'औंदा लग्नाचा इचार नाय' हे पुस्तक समाज परिवर्तनासाठी प्रभावी माध्यम आहे. १०० वर्षांपूर्वी गोविंद बल्लाळ देवल लिखित 'संगीत शारदा हे नाटक अनेक वर्षे गाजलं. या नाटकाचा विषय होता 'कोवळ्या वयातील मुलीचा बालविवाह. यातील 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान हे पद अजुनही रसिकांना आठवत असेल. असो!

पण समाजाच्या व विशेषत: बालवयातील मुलींच्या दृष्टिने ही अतिशय घातक परंपरा पूर्वापार अजुनही चालू आहे. डॉ. सौ. सुधा कांकरिया यांनी लिहिलेल्या 'औदा लग्नाच इचार नाय या छोटयाशा नाटुकलीतून या वाईट परंपरेवर चांगलाच घाव घातला आहे.

' औंदा लग्नाचा इचार नाय ही नाटुकली छोटीशी असली तरी त्यात फार मोठा आशय आहे. यामध्ये मुलगी म्हणजे मोठ ओझं, परक्याचं धन वगैरे गैरसमज दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सुशिक्षित व श्रीमंत लोक देखील मुलीच्या बापाकडून हुंडा वसूल करतात. असे सर्व महत्वाचे मुद्दे या नाटुकलीतून सहजसोप्या भाषेत मांडले आहेत. सोपं लिहिणं ही तशी अवघड गोष्ट! परंतू डॉ. सुधाताईनी ती सोप्या भाषेत अत्यंत भावपूर्ण रितीने समाजासमोर मांडली आहे. डॉ. सुधाताईनी ४१ वर्षा पासून सुरू केलेल्या 'स्त्री जन्माचे स्वागत करा या मोहिमेतून स्त्री विषय सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार करून त्याचा सर्वत्र प्रचार केला आहे. हे कार्य असामान्य व जनजागृती निर्माण करणारं आहे. प्रस्तूत नाटुकली औंदा लग्नाचा इचार नाय चे प्रयोग गावोगावी व्हावेत. शक्य असेल तिथे रोड शो करावा. अशी ही नाटुकली आहे. त्यातून बालविवाह ही कुप्रथा थांबविण्यात यावी. लोकांच्या या वाईट परंपरेचे भीषण परिणाम समोर यावेत हा या मागचा हेतू आहे.

सदर नाटिकेत बालविवाहाचे दुष्परिणाम, सामाजिक असमतोल तसेच आरोग्यविषयक प्रश्न अधोरेखित केले आहेत. या नाटिकेबद्दल महिला व बाल विकास अधिकारी अहिल्यानगर श्री नारायण कराळे यांनी शुभेच्छा देतांना म्हटले आहे की, डॉ. सुधा कांकरिया लिखित 'औंदा लग्नाचा इचार नाय! ही नाटिका मी वाचली. समाजप्रबोधन व लोकजागृतीसाठी हे एक उत्तम माध्यम आहे. स्त्री जन्माचे स्वागत – बेटी बचाओ या क्षेत्रात गेल्या चार दशकांपासुन डॉ. सुधाताई झोकुन देऊन कार्य करीत आहेत. वैद्यकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा नावलौकिक मोठा आहे मी त्यांचे अभिनंदन करतो. सदर नाटिकेद्वारे समाजातील बालविवाहाची क्रुर प्रथा संपुष्टात यावी अशी आशा बाळगतो.

– श्री. अनंत दसरे

आंतरराष्ट्रीय बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मुलन दिवसानिमित्त डॉ. सुधा कांकरिया लिखित औदा लग्नाचा इचार नाय पुस्तकाचे परिक्षण

कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना मिळाली ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव उपाध्ये यांची शाब्बासकीची थाप




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था श्रीरामपूर आयोजित, कवी सुभाष दादा त्रिभुवन यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय कवी संमेलन , आज दिनांक २५ नोव्हेंबर २६ रोजी ,गेस्ट हाऊस श्रीरामपूर येथे, ज्येष्ठ कविवर्य सायमन भारस्कर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कवी संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ कवी, गीतकार बाबासाहेब पवार होते .संमेलनाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे प्रा बाबुराव उपाध्ये हे होते.

उद्घाटन भाषणात बोलताना प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये म्हणाले कवी सुभाष दादा त्रिभुवन यांचे सामाजिक कार्य सर्वश्रुत, भरीव व नोंद घ्यावी असे आहे. संमेलन साठी वेगवेगळ्या भागातील कवी, साहित्यिक येथे आले आहेत. या गोष्टीचा अभिमान वाटतो. कथाकार बाळासाहेब देशमुख यांच्या कथा, कथाकथन कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्रात सर्वदूर गाजत आहेत. ही जिल्हाकरिता गौरवाची गोष्ट आहे. संमेलनाचे प्रास्ताविक माननीय बाबासाहेब पवार यांनी केले. संमेलनात कवी, कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी शिकवण रचना सादर केली.. नात्यांचे विरळ होत जाणारे पदर, समाजात माणुसकीचा ओसरलेला बहर , याविषयी त्यांनी शिकवण रचनेतून भाष्य केले. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर आकाशवाणीवर १२० प्रयोग प्रसारित झालेले आहेत. संमेलन करिता ज्येष्ठ कवी रूपचंद शिदोरे, आत्माराम शेवाळे, डॉ संजय दुशिंग सहभागी झालेले होते. संमेलनाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ कवी, पत्रकार डॉ.बाळासाहेब कोठुळे यांनी अतिशय बहारदार ,रसपूर्ण व ओजपूर्ण पद्धतीने करत संमेलनाची उंची वाढविली.

शुक्रवारी अहिल्यानगरला ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगरचे ज्येष्ठ विधीतज्ञ अँड.डी.डी. घोरपडे यांनी ''भारतीय संस्कृतीचा इतिहास'' अत्यंत सोप्या भाषेत लिहून यामध्ये ४ वेद, ११उपनिषदे, रामायण, महाभारत, ६ शास्त्र व १८ पुराणे, सर्व संप्रदाय तसेच पंथ भागवत धर्मातील संतांची संक्षिप्त माहिती यामध्ये दिलेली आहे. स्व.सौ.मंगलाताई घोरपडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून शुक्रवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा.नगर – छत्रपती संभाजी नगर – रोडवरील चेतना लॉन येथे ग्रंथ प्रकाशन सोहळा पार पडणार आहे.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे येथील ८९ वे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. यावेळी जेष्ठ संत साहित्य अभ्यासक प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे, संत साहित्याचे गाढे अभ्यासक व विचारवंत सद्गुरु साहेबराव आवारे, अहिल्यानगरचे खा. निलेश लंके, आ.संग्राम जगताप, श्रीगोंद्याचे आ.विक्रम पाचपुते,श्रीरामपूरचे आ.हेमंत ओगले,महापौर ज्योतीताई गाडे तसेच नगरसेवक, लेखक, साहित्यिक, अभ्यासक, उपस्थित राहणार आहेत.तरी या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यासाठी नगरकरांनी उपस्थित रहावे.असे आवाहन अँड.घोरपडे यांनी केले आहे.

दिव्यांगांच्या हक्कांसाठी विळदघाट येथे विशेष कार्यशाळा

कायदेशीर पालकत्व आणि 'निरामय' आरोग्य विमा योजनेबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन संविधान दिनानिमित्त आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना आरोग्य सुरक्षेचे कवच मिळावे आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचालित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट यांच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी), विळदघाट येथे ही कार्यशाळा होणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मात्र, योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि प्रशासकीय प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचविणे, त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करणे आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यशाळेत 'दिव्यांगांसाठी सर्वकाही' या पुस्तकाचे लेखक तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ, मुंबईचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाच्या आधारे ते दिव्यांग व्यक्तींचे कायदेशीर हक्क, पालकत्वासंबंधी कायदेशीर तरतुदी, आरोग्य विमा योजना आणि त्यासंबंधित प्रक्रियांविषयी मार्गदर्शन करणार आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या पालकांसमोर त्यांच्या पश्चात पाल्याची काळजी कोण घेणार, त्याच्या आर्थिक व कायदेशीर हितांचे संरक्षण कसे होणार आणि आवश्यक निर्णय घेण्यासाठी त्याला योग्य सहाय्य कसे उपलब्ध होणार, असे अनेक प्रश्न असतात. राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने कायदेशीर पालकत्व तसेच निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक सहाय्याबाबत कार्यशाळेत माहिती दिली जाणार आहे.

कायदेशीर पालकत्वाची आवश्यकता कोणत्या परिस्थितीत भासते, त्यासाठी अर्ज कसा करावा, स्थानिक स्तर समितीची भूमिका काय असते, कोणती कागदपत्रे आवश्यक असतात आणि कायदेशीर पालकाच्या जबाबदाऱ्या कोणत्या, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रक्रियेत दिव्यांग व्यक्तीची इच्छा, स्वायत्तता, प्रतिष्ठा, गोपनीयता आणि कायदेशीर हक्कांचा सन्मान राखण्याचे महत्त्वही अधोरेखित केले जाणार आहे. याशिवाय, राष्ट्रीय न्यासामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'निरामय' आरोग्य विमा योजनेची माहितीही या कार्यशाळेत दिली जाणार आहे. स्वमग्नता (ऑटिझम), प्रमस्तिष्क पक्षाघात, बौद्धिक दिव्यांगत्व आणि बहुविकलांगता असलेल्या पात्र व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येतो. योजनेच्या प्रचलित अटी व नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध होऊ शकते. या विमा संरक्षणामध्ये निर्धारित मर्यादेनुसार रुग्णालयातील उपचार, औषधे, वैद्यकीय तपासण्या, पात्र शस्त्रक्रिया, दंत आरोग्य सेवा, नियमित उपचारात्मक थेरपी, आयुष उपचार आणि वाहतूक खर्चाचा समावेश आहे. विमा लाभ खर्च प्रतिपूर्ती पद्धतीने दिले जातात. योजनेसाठी आवश्यक पात्रता, नोंदणी, नूतनीकरण, कागदपत्रांची पूर्तता आणि विमा दावा सादर करण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर

कुरुंदमध्ये ३१७ लक्ष रुपयांचे विकासकामांचे भूमिपूजन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– मौजे कुरुंद येथे तब्बल ३१७ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. गावाच्या मूलभूत सुविधांसह सामाजिक, शैक्षणिक आणि दळणवळणाच्या विकासाला चालना देणाऱ्या या कामांमुळे कुरुंदच्या विकासात महत्त्वपूर्ण भर पडणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत सर्वाधिक २६० लाख रुपये खर्चाच्या रा.म.मा. ७६१ कुरुंद, भोसलेवाडी ते नरवडेवाडी रस्ता, ग्रा.मा. १२८, साखळी क्र. ०/० ते ३/० या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ होण्याबरोबरच शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करणे सोयीचे होणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने हे काम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

त्याचबरोबर कुरुंद येथे २५ लाख रुपये खर्चून संविधान सभागृह बांधण्यात येणार असून, गावातील सामाजिक, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी हक्काची जागा उपलब्ध होणार आहे. तसेच कुरुंद येथील स्मशानभूमी ते शिवाईमाता मंदिर या रस्त्याच्या कामासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे नागरिकांची गैरसोय दूर होऊन धार्मिक व सार्वजनिक ठिकाणी जाण्यासाठी अधिक चांगली सुविधा निर्माण होणार आहे.

शैक्षणिक सुविधांच्या बळकटीकरणासाठी हमालवाडी (कुरुंद) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या बांधकामासाठी १२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, शाळेचा भौतिक विकास व्हावा आणि शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अशा प्रकारे रस्ते, सामाजिक सुविधा, धार्मिक स्थळांकडे जाणारे मार्ग आणि शैक्षणिक सुविधा अशा विविध क्षेत्रांतील एकूण ३१७ लाख रुपयांची विकासकामे कुरुंद गावासाठी मार्गी लागली आहेत.

यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले की, मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. विकासकामे करताना केवळ आश्वासने न देता ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. गावातील रस्ते, शैक्षणिक सुविधा, सामाजिक सभागृहे आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन विकासाचा समतोल साधण्याचा आपला प्रयत्न आहे. कुरुंद गावासाठी ३१७ लाख रुपयांची विकासकामे मार्गी लागणे ही समाधानाची बाब असून, या कामांमुळे गावाच्या प्रगतीला निश्चितच नवी दिशा मिळेल. जनतेने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी विकासकामांचा पाठपुरावा यापुढेही सातत्याने सुरू राहील. गावाच्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन विकासाचा

काकनेवाडीच्या उपसरपंचपदी संभाजी वाळुंज यांची बिनविरोध निवड!

खासदार नीलेश लंके यांच्या विश्वासू कार्यकर्त्याला गावकारभाराची संधी; सामाजिक कार्याची पोहोचली पावती!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



पारनेर– माझी उपसरपंच पदी निवड म्हणजे माझ्यावर वाढलेली जबाबदारी आहे गावातील अनेक प्रश्न समस्या निलेशजी लंके यांच्या माध्यमातून सोडवण्याकरिता मी या पदाचा उपयोग करीन. संभाजी वाळुंज(नवनियुक्त उपसरपंच काकनेवाडी काकनेवाडी या गावातील मा उपसरपंच सौ पारुबाई रभाजी वाळुंज यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर, संभाजी पोपट वाळुंज यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नवनियुक्त उपसरपंच संभाजी पोपट वाळुंज यांचे अभिनंदन करण्यासाठी अहिल्यानगर दक्षिण चे खासदार निलेश लंके उपस्थित होते.

संभाजी वाळुंज यांचा आजपर्यंत चा राजकीय प्रवास खडतर राहिलेला आहे. घरात सुरुवातीपासून सामाजिक आणी राजकीय कामाचा वारसा त्यांना त्यांचे आजोबा आणि वडील पोपट वाळुंज यांच्याकडून मिळाला. वडील गेली अनेक वर्षे ग्रामपंचायत सदस्य आणी सोसायटी चेरमन पदी राहिले होते. संभाजी वाळुंज यांनी आपली राजकीय जीवनाची सुरवात खासदार निलेशजी लंके यांच्या सोबत केली.

निलेश लंके यांनी शिवसेना सोडल्या नंतर लंके साहेबांचे विश्वासू मानले जाणारे अनेकांनी सत्ते सोबत जात निलेश लंके यांची साथ सोडली. परंतु संघर्षाच्या काळात निलेश लंके यांच्या सोबत राहून व त्यांनाच राजकीय आदर्श मानून सामाजिक काम सुरु ठेवले. निलेश लंके आमदार असताना गावात श्रीराम मंदिरा समोरील भव्य सभा मंडप दोन पाझर तलाव दुरुस्ती पानंद रस्ते असा जवळपास दीड कोटी रुपयांचा निधी काकनेवाडी गावासाठी आणला.निलेश लंके प्रतिष्ठान च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायकल वाटप, वही पुस्तके वाटप, गरजूना वैद्यकीय मदत अशी सामाजिक कामे संभाजी वाळुंज नेहमीच करत असतात. आज याच सर्व सामाजिक सेवेचा परिपाक म्हणजे त्यांची आज काकनेवाडीच्या बिनविरोध उपसरपंच पदी निवड झाली

यावेळी लोकनियुक्त सरपंच अशोक पारजी वाळुंज, ग्रामपंचायत सदस्य संगीता विजय वाळुंज, वृषाली अनिल वाळुंज गिताराम वाळुंज जयश्री वाळुंज व मा उपसरपंच पारुबाई रभाजी वाळुंज पोपट वाळुंज, ठाकाजी वाळुंज,विनायकशेठ वाळुंज भिकाजी वाळुंज तुकाराम वाळुंज आबा वाळुंज बाबासाहेब वाळुंज शांताराम नवले संतोष वाळुंज राजुशेठ झावरे मुकेश वाळुंज सचिन वाळुंज सुभाष वाळुंज प्रशांत वाळुंज अर्जुन वाळुंज उपस्थित होते.यावेळी शम्भूराजे मित्र मंडळाचे अध्यक्ष गवराम शेठ वाळुंज व उपाध्यक्ष हभप रंगनाथ महाराज वाळुंज यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

अहिल्यानगरच्या मुलींची राज्य संघाच्या दिशेने झेप!

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघाच्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी प्रांजल काकडे व सिद्धी पोटे यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्हा फुटबॉल असोसिएशन (), अहिल्यानगरच्या कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघातील प्रांजल अर्जुन काकडे आणि सिद्धी शिवाजी पोटे या दोन खेळाडूंची महाराष्ट्र राज्य कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघाच्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे. हे निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिर बुधवार २५ नोव्हेंबर पासून मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरातून निवडण्यात येणारा महाराष्ट्राचा संघ आगामी राष्ट्रीय कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणार असून ही राष्ट्रीय स्पर्धा १२ ते १७ डिसेंबर २०२६ दरम्यान गुवाहाटी, आसाम येथे पार पडणार आहे.

प्रांजल काकडे आणि सिद्धी पोटे यांनी नुकत्याच जळगाव येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ मुलींच्या आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हा संघाला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. उपांत्यपूर्व फेरीत अहिल्यानगर संघाला अत्यंत अटीतटीच्या सामन्यात निसटत्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला. मात्र, खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, कौशल्य आणि सांघिक भावना निश्चितच कौतुकास्पद ठरली.

अहिल्यानगरसाठी ही निवड विशेष अभिमानाची बाब आहे. यापूर्वी वरिष्ठ महिला संघातील सुमय्या



शेख आणि राणी कदम यांनी सलग दोन हंगाम महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यानंतर त्यांना महाराष्ट्राच्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. आता कनिष्ठ मुलींच्या गटातील दोन खेळाडूंची राज्य संघाच्या निवड प्रक्रियेसाठी झालेली निवड ही अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला फुटबॉलच्या प्रगतीतील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

जिल्ह्यातील मुलींच्या फुटबॉलला प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, या यशामुळे भविष्यात अधिकाधिक मुलींना फुटबॉलकडे वळण्यासाठी आणि राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास असोसिएशनने व्यक्त केला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजीतसिंह शाही, मानद सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, खजिनदार रिशपाल सिंह परमार, सहखजिनदार रणबीर सिंह परमार, तसेच कार्यकारिणी , जिल्हा संघ प्रशिक्षक प्रसाद पाटोळे, संघ व्यवस्थापक आश्विनी पाटोळे आणि असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

या यशामध्ये जळगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेपूर्वी गुलमोहर फुटबॉल क्लबने अहिल्यानगर जिल्हा कनिष्ठ मुलींच्या संघाला सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यासह प्रशिक्षण व तयारीसाठी सहकार्य केल्याबद्दल गुलमोहर फुटबॉल क्लबचे विशेष आभार मानले. तसेच कार्यकारिणी सदस्य पल्लवी सैंदाणे आणि कार्यकारिणी सदस्य तसेच गुलमोहर फुटबॉल क्लबचे मालक जोहेब खान यांच्या सहकार्याचे व योगदानाचे असोसिएशनतर्फे विशेष कौतुक करण्यात आले.

मुंबई येथे होणाऱ्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी प्रांजल आणि सिद्धी यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून, महाराष्ट्राच्या राष्ट्रीय संघात स्थान मिळवून राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांना उज्ज्वल यश लाभो, अशा सदिच्छा व्यक्त केली आहे.

भक्ती, सेवा आणि सामाजिक एकोप्याचा वारसा जपण्यासाठी धार्मिक उत्सव आवश्यक – गणेश कवडे

श्री साईबाबा मंदिर वर्धापन दिन सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता; हभप जंगले महाराज शास्त्री यांचे संतविचारांचे मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– नालेगाव येथील वाघगल्ली परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. सप्ताहानिमित्त आयोजित पालखी मिरवणूक, भजन, कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या कीर्तनातून भक्ती, श्रद्धा, माणुसकी आणि संतविचारांचा संदेश उपस्थित भाविकांना मिळाला.

वर्धापन दिन सप्ताहानिमित्त श्री साईबाबांची पालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली होती. साईनामाचा जयघोष, भक्तिमय वातावरण आणि भाविकांचा सहभाग यामुळे परिसरात धार्मिक उत्साह निर्माण झाला. मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त चार दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भजन, कीर्तन आणि आध्यात्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना संतांच्या विचारांचा व भक्तीचा अनुभव घेता आला.

यावेळी आयोजक तथा नगरसेवक गणेश कवडे यांनी मनोगत व्यक्त करताना, धार्मिक उत्सव हे समाजाला एकत्र आणणारे आणि सामाजिक एकोपा वाढविणारे महत्त्वाचे माध्यम असल्याचे सांगितले. मंदिर हे केवळ दर्शनाचे ठिकाण नसून श्रद्धा, संस्कार, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारे केंद्र असते. साईबाबांनी दिलेला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटक एकत्र येतात, परस्परांमध्ये संवाद वाढतो आणि नव्या पिढीला संस्कारक्षम वातावरण मिळते, असे त्यांनी नमूद केले.

मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सप्ताहामागे केवळ धार्मिक परंपरा जपणे एवढाच उद्देश नसून परिसरातील नागरिक, युवक आणि भाविकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे गणेश कवडे यांनी सांगितले. धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमधून परिसराच्या विकासासाठी नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा.



ग्रामीण विकास केंद्र सीएसआरडी या संस्थेच्या एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमास पन्नास वर्षे पूर्ण झाले आहेत. त्या निमिताने संचालक डॉ.सुरेश पठारे यांनी श्री.धनंजय जाधव उपमहापौर यांना कार्यक्रमाची रूपरेषा सांगून त्यांच्या सहकार्या बद्दल सत्कार केला.त्यावेळी उपस्थित मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी रफिक मुन्शी आणि माजी विद्यार्थी श्री.शिंदे उपस्थित होते.

खडांबे (खुर्द) येथे डॉ.विखे पाटील फौंडेशनच्या कृषिदूतांचे स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राहुरी तालुक्यातील खडांबे (खुर्द) येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट येथील कृषिदूतांचे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न असलेल्या डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट येथील विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत गावात दाखल झाले असून, आगामी कालावधीत ते शेतकऱ्यांशी संवाद साधून आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी विषयक प्रात्यक्षिके आणि विविध शासकीय योजनांची माहिती देणार आहेत.

डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे सेक्रेटरी जनरल प्रा.डॉ.पांडुरंग गायकवाड, संचालक (तांत्रिक) प्रा.सुनील कल्हापुरे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.सोमेश्वर राऊत, उपप्राचार्य प्रा.डॉ.हरिभाऊ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. किरण दांगडे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.मिनीनाथ अनारसे व प्रा.डॉ. दीपिका मावळे तसेच विविध विषयांच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ७ कृषिदूत आकाश खामकर, धीरज कणसे, रवींद्र भुसावरे, अरविंद दराडे, धम्मदीप जावळे, अविनाश काळे आणि सत्यजित काळे हे विद्यार्थी शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमांतर्गत कृषिदूत शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या, अनुभव आणि गरजा जाणून घेऊन त्यांना शास्त्रीय पद्धतीने शेती करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये माती परीक्षण, फळबाग लागवड व व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, आधुनिक कृषी अवजारांचा वापर, शेतीचे आर्थिक नियोजन, पशुधन व्यवस्थापन व जनावरांचे लसीकरण आदी विषयांवर प्रात्यक्षिके, चर्चा आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच शेतकरी व ग्रामस्थांमध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

गावात कृषिदूतांचे आगमन झाल्यानंतर सरपंच श्री.अण्णासाहेब माळी, उपसरपंच श्री.केदार पवार, ग्रामसेवक श्री.शिवाजी ढगे कृषी सहाय्यक श्री.शिवाजी पवार सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच प्रगतशील शेतकरी श्री. शंकर कारले, श्री.संदीप कल्हापुरे, श्री.शुभम शेळके, श्री.मकरंद कारले आणि श्री. विजय कल्हापुरे यांनी कृषिदूतांचे स्वागत केले.

ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमामुळे कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रामीण जीवन, शेती पद्धती आणि शेतकऱ्यांच्या समस्या यांचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार असून, विद्यार्थी आणि शेतकरी यांच्यात ज्ञान व अनुभवांची देवाणघेवाण घडून येणार आहे. गावात राबविलेल्या विविध उपक्रमाबद्दल कृषिदुतांचे आभार मानण्यात आले.



नगर – छत्रपती संभाजी नगर रोडवरील तपोवन नगर मधील श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा,कळस पुजा नागरिकांच्या हस्ते विधिवत पूजा करून संपन्न झाला. याप्रसंगी हभप महाराज मंडळी, परिसरातील महिला, नागरिक उपस्थित होते. (छाया – विजय मते)

डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत खडांबे बुद्रुकमध्ये

स्थानिक शेतकऱ्यांनी केले कृषी दुतांचे स्वागत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट येथील कृषी पदवीच्या विद्यार्थ्यांचे ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नता कार्यक्रमांतर्गत राहुरी तालुक्यातील खडांबे बु.येथे आगमन झाले. यावेळी प्रशासक मॅडम , ग्रामसेविका मॅडम तसेच ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या वतीने कृषिदूतांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

कृषिदूतांमध्ये चि. ऋषिकेश सावंत, चि. ज्ञानेश्वर शेकडे, चि. शुभम पठाडे, चि. रामेश्वर जाधव, चि. सुयश रौंदळ, चि. साहिल मुठे, चि. विजय मेहेत्रे यांचा समावेश आहे. यावेळी खडांबे बु.येथील कृषिदूतांच्या आगमनप्रसंगी गावच्या प्रशासक जाधव मॅडम, ग्रामसेवीका हारदे मॅडम,माजी पोलीस पाटील जयसिंगराव पवार, सहाय्यक कृषी अधिकारी शिवाजी पवार, ग्रामपंचायत कर्मचारी नानासाहेब पांडुरंग साळे आणि बाळासाहेब भालेराव, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अमोल जयसिंग पवार तसेच प्रगतशील शेतकरी मंगेश कल्हापुरे, दत्तात्रेय ताकते, कैलास ताकते, काशिनाथ तोंडे आदी मान्यवरांनी कृषिदूतांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे सेक्रेटरी जनरल प्रा. डॉ. पांडुरंग गायकवाड, संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत व उपप्राचार्य प्रा. डॉ. हरिभाऊ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनीनाथ अनारसे व प्रा. डॉ. दीपिका मावळे आणि इतर प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत कृषिदूत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक संरक्षण, मृदा आरोग्य, सुधारित बियाणे, खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शेतीविषयक समस्यांवर शास्त्रीय उपाययोजना सुचविणे, कृषी प्रात्यक्षिके आयोजित करणे आणि जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून पशुपालकांना जनावरांचे आरोग्य, लसीकरण, रोगप्रतिबंधक उपाय, संतुलित आहार आणि दुग्धव्यवसाय व्यवस्थापनाबाबतही माहिती दिली जाणार आहे. शेती व पूरक व्यवसायांचा अभ्यास करून उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली जाणार आहे.

ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नता कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील सामाजिक व कृषी परिस्थिती, पारंपरिक शेतीपद्धती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी समजून घेण्याची प्रत्यक्ष संधी उपलब्ध होणार आहे.

(पान १ वरून)

संविधान दिन सामाजिक बांधिलकी आणि अधिकार-जाणिवेचे प्रतीक- आमदार संग्राम जगताप

आणि प्रसार करण्याचे कार्य सातत्याने केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, सुरेशभाऊ बनसोडे, सुमेध गायकवाड, इंजि. परिमल निकम साहेब, प्रा. माणिक विधाटे सर, प्रा. जयंत गायकवाड, अमित काळे, सिद्धार्थ आढाव, विलास साठे, विजयराव भांबळ, महेश भोसले, प्रा.डी.आर. जाधव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, सृजन भिंगारदिवे, प्रा. एल.बी. जाधव, प्रा. कदम सर, प्रा. गायकवाड सर, मृणाल भिंगारदिवे, अजय पाखरे, लक्ष्मण माघाडे, निखिल साळवे, गौतम म्हस्के, यशवंत भाबळ, गौतम पाचारण, दीपक पाटोळे, श्रेयस भिंगारदिवे, सतीश शिरसाठ, अंकुश मोहिते, रवी कांबळे, संजय भिंगारदिवे, प्रा गजभिये सर, अविनाश कांबळे, आकाश कदम, नितीन खंडारे, बौद्धचार्या ठोंबे यांच्यासह आंबेडकरी समाजातील विविध मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गंगासागर यात्रेकरूंच्या संकटात नीलेश लंके यांची धाव

जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय तसेच पश्चिम बंगाल प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि गंगासागर यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जलवाहतुकीच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

भगवानगड पिण्याचे व शेती सिंचनाच्या पाण्यासाठी शेतकरी महिला ऊसतोड मजुरांचा उद्रेक; कितने यांच्या उपोषणाला यश

अधिकारी राजेंद्र धस तहसीलदार डॉ.उद्धव नाईक तसेच मंडळ अधिकारी तलाठी यांनी तातडीने भगवानगड परिसरात वाड्यावर प्रतिदिवशी वाढीव लोकसंख्या जनगणनेनुसार प्रति गावात वाढीव टँकरच्या खेपा आणि मुबलक पाणी साठा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त आंदोलन स्थळी उपस्थित होता तब्बल तीन तास रस्ता रोको महामार्ग रुखल्यानंतर आंदोलन स्थगित केल्यानंतर वाहतूक सुरळीत पार पडली.

शहीद जवानांचे बलिदान आणि संविधानातील मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी - नलिनी गायकवाड

जवान अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या त्यागामुळेच आपण सुरक्षित जीवन जगू शकतो. त्यामुळे शहीद जवानांचे बलिदान कधीही विसरता कामा नये. २६ नोव्हेंबर हा संविधान दिन असून भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा आणि न्यायाचा अधिकार दिला आहे. संविधानातील मूल्यांचे जतन करणे, सामाजिक सलोखा राखणे आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानाचा केवळ गौरव न करता त्यातील विचार आपल्या आचरणात आणणे, हीच संविधान दिनाची खरी सार्थकता ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून सोडले होते. मात्र, या संकटाच्या काळात भारतीय सुरक्षा दलातील जवानांनी दाखवलेले धैर्य, शौर्य आणि देशाप्रती असलेली निष्ठा आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या बलिदानातून देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा मिळते.या प्रसंगी सोशल ऍक्टिव्हिटीस. नलिनी गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या रंजनीताई ताठे, शकुंतलाताई लोखंडे, राजू देठे, रवी सातपुते, दिलीप घुले, राजेंद्र कर्डिले, विशाल केदारी, राम झिने, सेवानिवृत्त तहसीलदार सुनील बनसोडे आदी उपस्थित होते.

केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे यांच्या पाठपुराव्याला यश

उत्पादक संस्था, शेतकरी गट तसेच स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करणे आणि चाऱ्याचे योग्य नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. चारा बँक सुरू करण्याबाबत शासनाकडून अधिकृत सूचना प्राप्त झाल्याने पशुधन पालकांसाठी दिलासादायक निर्णय ठरला आहे. या निर्णयामुळे दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता आणि नियोजन करण्यास मदत होणार आहे. शासनाच्या या निर्णयाबद्दल केडगाव भाजप मंडलाच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच पणन मंत्री जयकुमार रावल यांचे आभार व्यक्त करण्यात आले.